पुढारी | मुंबई बुधवार, २४ मे २०१७

# मदरशांमध्ये तंबाखू विरोधी मोहीम सुरू

**मुंबई :** तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव तरुणांना करून देण्यासाठी मुंबईतील मदरशांमध्ये इंडियन डेंटल असोसिएशन(आयडीए)द्वारे विशेष तंबाखू विरोधी मोहिम सुरू करण्यात आली आहे. याकरता असोसिएशनने मालाड येथील मालवणीमधील मदरसा जामिया अर्बिया मिन्हाजुल सुन्नाह येथे नुकतेच पहिले प्रात्यक्षिक दाखवले. या मदरशांमध्ये मौखिक जागरूकता शिबिरे घेण्यात आली. यात मदरशातील शिक्षकांसह विद्यार्थ्यांना तंबाखू पदार्थांच्या दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. अमली पदार्थ तुमच्या संवेदना मारतात आणि शरीरातील रोगप्रतिकारशक्ती कमी करतात. त्यामुळे व्यसन सोडून द्या, असे आवाहन आयडीएचे मानद सरचिटणीस डॉ. अशोक ढोबळे यांनी केले आहे. हा विषय विद्यार्थ्यांना समजावून सांगतात त्यांची प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी ब्रश व जबड्याच्या मॉडेलचा वापर केला.